जिल्हाधिकारी कार्यालय,बीड.
(पाणी टंचाई विभाग)

☎ दुरध्वनी क्र. ०२४४२(२२२६०४) @ ई-मेल.- bmkamble.rdcbeed@gmail.com


जा.क्र.२०१८/मशाका/कक्ष-३/पिपाटं-/कावी-१९३२/सिआर-१५४/ दि. २५ डिसेंबर,२०१८.

## * ई- निविदा प्रसिध्दी सुचना *

**दिनांक ३१ डिसेंबर २०१९ या कालावधी पर्यंत बीड जिल्हयातील पाणी टंचाई असलेल्या गावे व वाडयांना पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा करणेसाठी खाजगी टँकर पुरवठा कंत्राटदारासाठी ची ई निविदा मागविण्यात येत आहे.**

**उपरोक्त ई निविदा बाबतचा फॉर्मची विक्री व स्विकृती व निविदा उघडण्याची कार्यवाही पुढील प्रमाणे राहिल.**

| | |
|---|---|
| **०१.निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दिनांक** | **- २७.१२.२०१८. ते १७.०१.२०१९.** |
| **०२.निविदा फॉर्म ऑनलाईन स्विकृतीचा दिनांक** | **- २७.१२.२०१८. ते १७.०१.२०१९. (कार्यालयीन वेळेत)** |
| **०३.निविदा लिफाफा १ व २ उघडण्याचा दिनांक व ठिकाण** | **- १९.०१.२०१९. वेळ सकाळी ११.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय,बीड.** |

निविदा फॉर्म विक्री व स्विकृतीची कार्यवाही वरील कालावधीत WWW.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येईल. दिनांक १९.०१.२०१९. रोजी निविदा उघडण्याचे वेळी सर्व निविदाकरांनी जिल्हाधिकारी कार्यालय,बीड येथे उपस्थित रहाणे आवश्यक आहे. अधिक माहिती व उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे.तसेच सविस्तर निविदा सुचना http://beed.gov.in/ वरही उपलब्ध आहे.

**(स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे)**

जिल्हाधिकारी,बीड करिता

जा. क्र.२०१८आरबी/डेस्क-३/पिपाटं/कावि-१९३१/सिआर १५४/
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
दिनांक :२५ डिसेंबर,२०१८.

## ई-निविदा सूचना :-

३१,डिसेंबर,२०१९ अखेर पर्यंतसाठी बीड जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांना/वाड्यांना, टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी अनुभवी व सक्षम कंत्राटदाराकडून याव्दारे ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

इच्छूक कंत्राटदारानी दिनांक. १७.०१.२०१९ चे कार्यालयीन वेळे पर्यंत ई-निविदा www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात. ई-निविदा दिनांक. १९.०१.२०१९ रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे उपस्थित कंत्राटदार / अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषीत केले असेल किंवा त्या बाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्यांचेशी संलग्न असलेले कंत्राटदारांनी ई-निविदा भरु नयेत.अशा कंत्राटदारांनी ई-निविदा भरल्यास त्यांची ई-निविदा विचारात घेतली जाणार नाही.

२. दिनांक २७.१२.२०१८ ते दिनांक १७.०१.२०१९ या कालावधीत कार्यालयीन वेळे पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळाशी संपर्क साधुन ना परतावा ई-निवीदा फि रक्कम रु २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) नेट बँकींगव्दारे जमा करुन ई-निविदा फॅार्म Download करावा.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र.टंचाई-२०१८/प्र.क्र.१६७/पापु १४ दि.१९ डिसेंबर,२०१८ नुसार विहित केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| टँकर / ट्रक वरील टाकीची पाणी वहण क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये ) | कमाल प्रति किलोमीटर भाडे (रुपये) |
|---|---|---|
| १ मे.टन | २७०.०० | ३.४० |

उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने निर्देशीत केल्या नुसार ई निविदेत भरावयाचे दर कमाल मर्यादेपेक्षा कमी रहातील हे इच्छुक निविदाकाराने पहावे या कमाल मर्यादेच्या वर आलेले दर ग्राह्य धरण्यात येणार नाहीत

(i) ई-निविदे च्या तपशिलवार अटी /ई-निविदा फॉर्म सोबत दिल्या जातील.

(ii) ई-निविदा दोन लिफाफे पध्दतीने भरावी लागेल.

(iii) लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची पुर्तता न केल्यास लिफाफा क्र.२ उघडण्यांत येणार नाही.

### अ) लिफाफा क्रमांक (१) : "तांत्रिक निविदेचा लिफाफा"

२. प्रस्तूत ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. अ) लिफाफा क्रमांक (१) : "तांत्रिक निविदेचा लिफाफा" मध्ये खालील बाबी ठेवण्यात यावेत.

१. या लिफाफ्यात ई-निविदा फॉर्मची निविदा मुल्य ना परतावा रक्कम रुपये २५,०००/- व बयाणा रक्कम रु १,५०,००,०००/-(रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) ची E-Receipt सादर करावी.

२. किमान दहा टँकर्स/ ट्रक स्वतःचे मालकीच्या असल्याचे पूरावे ई-निविदा पत्रामध्ये या सोबत देण्यात आल्या नुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (ARTO) यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झालेले विहित विवरणपत्रातील माहितीसह प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३. गाड्यांचे नोंदणी (रजिस्ट्रेशन) केल्याचा पुरावा.(आर.सी.बुकाच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती).

४. वाहन कर (आर.टी.ओ.कडील टॅक्स) भरणा केल्याचे प्रमाणपत्र/पुरावा.

(कृपया पान क्र २ पहा )

५. ओडोमीटर दुरुस्त असल्या बाबतचे आर.टी.ओ.चे चालू वर्षाचे प्रमाणपत्र किंवा निविदा कालावधीमध्ये वाहन सुस्थितीत असले बाबत आर.टी.ओ.चे फिटनेस सर्टिफीकेट सादर करणे बंधन कारक राहील.

६. विमा प्रमाणपत्र, महाराष्ट्र शासनाचा व्यवसायकर भरल्याचा पुरावा.

७. वाहनाचे वैध प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र.

८. महाराष्ट्र राज्य अंतर्गत वाहन चालविण्याचा परवाना (पी.जी.डी.सी. परवाना) संबधिताकडे असणे आवश्यक आहे.

९. मा.परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक दिनांक. २१.०८.२०१८, भारत सरकार राजपत्र दिनांक १६ जुलै २०१८ व ०६ ऑगस्ट २०१८ मधील तरतुदीनुसार सदरची वाहनाची पाणी वहनक्षमता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रमाणित केलेली ग्राहय धरण्यात येईन त्यानुसार परवाना सादर करावा लागेल.

१०. ई-निविदेसाठी इच्छुक निविदाधारकाने त्याच्या मालकीच्या वाहनांची माहिती नमुद करताना आवश्यक असलेले त्याच्या मालकीची किमान १० वाहने जी प्रस्तुत ई-निविदा भरताना अंतर्भुत केलेली आहेत ती वाहने पाणी पुरवठया साठी आवश्यकतेनुरुप वापरात घेण्यात येतील परंतु सदर ई निविदा भरताना अंतर्भुत केलेल्या मालकीच्या १० वाहनांचा वापर यशस्वी निविदा धारकाने सद्यस्थितीत इतर कोणत्याही निविदेच्या कामात इतरत्र कोठेही वापर केलेला असु नये,असे निदर्शनास आल्यास ठेकेदाराची ई -निविदा जरी अंतीम झाली असली तरी अशा ई-निविदा धारकाची ई-निविदा / कंत्राट रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल व त्याचे विरुद्ध फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंदवुन काळया यादीत देखील समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

११. ई-निविदाकार भागीदारी संस्था / वाहतुक कंपनी / सहकारी संस्था असल्यास नोंदणी प्रमाणपत्राची, संस्थेच्या बायलॉजची प्रत, रोख भांडवल, मागील सलग पाच वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्या संबधीचा संस्थेचा ठराव. तसेच निविदाकार व्यक्तिगत निविदाकार असल्यास मागील सलग तीन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे विवरणपत्र व पॅन कार्डची छायाकिंत प्रत जोडणे बंधन कारक राहील.नवीन संबधित वैयक्तीक निविदाकार अथवा संस्था यांना वस्तु व सेवा कर (GST) अधिकृत नोंदणीक्रमांक असणे अधिकृत असणे बंधनकारक आहे तसेच सदरील कर प्रणालीमध्ये शासनामार्फत वेळोवेळी करण्यात येणारे बदल लागु राहतील.

१२. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे बाबत अनुभवाचे शासकीय अधिकारी / प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व तत्कालीन करारनाम्याच्या प्रतीसह सादर करणे बंधनकारक राहिल.

१३. जिल्हयातील या वर्षी झालेले कमी पर्जन्यमान व उपलब्ध जलसाठयाची परिस्थिती विचारात घेता टंचाई मोठया प्रमाणावर जाणवण्याची शक्यता नाकारता येत नाही हे विचारात घेऊन निविदाकारास एका निविदा कालावधीत केलेल्या कामाचा अनुभव किमान १०० टँकरद्वारे पाणीपुरवठा केलेला असावा.

१४. इच्छुक निविदाकारास / कंत्राटदारास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्या बाबतचे / तो काळया यादीत समाविष्ठ नसल्या बाबतचे शपथपत्र सादर करावे.संबधितास शिक्षा झाली असल्यास / सदर शिक्षेचा अमल सद्यस्थितीमध्ये चालु नसलेबाबतचे शपथपत्र सादर करावे.

१५. सदर लिफाफ्यात निविदा धारकाचे / संस्थेचे नांव, संपर्काचा संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक, ई -मेल आय.डी. सह निविदाकार वैयक्तिक असल्यास त्याचा स्वत;चा आधार कार्ड क्रमांक व निविदाकार संस्था असल्यास संस्थेच्या प्रवर्तकाचे आधार कार्ड क्रमांक नमुद करावा.

१६. ई - निविदेच्या सर्व अटी व शर्ती मान्य असले बाबत शपथपत्र सादर करावे लागेल.

**ब) लिफाफा क्रमांक (२) : "या लिफाफ्यामध्ये BOQ.मध्ये फक्त दर भरुन www.mahatenders.gov.in वर अपलोड निविदाकाराने सर्व करांसहित दर भरावेत."**

1.प्रस्तुतची ई-निविदा सूचना वेबसाईट **http:/beed.nic.in** वर ही उपलब्ध आहे.

२. ई-निविदा उघडण्याची तारीख, वेळ व तसचे अटी व शर्तीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास बदलण्या बाबतचे अधिकार जिल्हाधिकारी बीड यांनी राखुन ठेवले आहेत.

स्थळ : बीड

दिनांक : २५.१२.२०१८. **(स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी असे.)**

**जिल्हाधिकारी,बीड करिता**

(कृपया पान क्र ३ पहा )